दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १३८ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२१ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मिळणार क्रीडा क्षेत्राला बळकटी!

## दाताळा येथील वीर बाबुराव शेडमाडे स्टेडियमच्या क्रीडा संकुलाला मिळणार १३७ कोटींची प्रशासकीय मान्यता

## आ.मुनगंटीवार यांच्या मागणीला क्रीडामंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई (प्रतिनिधी): राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला अधिक मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले असून, चंद्रपूर जिल्ह्यातील दाताळा येथील वीर बाबुराव शेडमाडे स्टेडियमच्या अत्याधुनिक क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी १३७ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात आ.मुनगंटीवार यांच्या मागणीला क्रीडामंत्री ना. दत्तामामा भरणे यांनी बैठकीत सकारात्मक प्रतिसाद देत मंजुरीसाठी आश्वस्त केले. दाताळा येथील होणारे संकुल क्रीडाक्षेत्रातील खेळाडूंना प्रेरणादायी ठरेल असा विश्वास यावेळी आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.**

राज्याचे क्रीडामंत्री दत्तामामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात विशेष बैठक पार पडली. यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांची प्रमूख उपस्थिती होती यावेळी दिग्गीकर अप्पर मुख्य सचिव, सोनावणे क्रीडा आयुक्त ,सुधीर मोरे सहसंचालक तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश फुंड,संजय सबनीस, शेखर पाटील क्रीडा विभागातील अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत प्रस्तावित दाताळा येथील वीर बाबुराव शेडमाके स्टेडियमच्या क्रीडा संकुलाच्या संपूर्ण आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. अत्याधुनिक क्रीडा सुविधांसह हे संकुल जिल्ह्यातील युवा खेळाडूंसाठी एक प्रेरणादायी केंद्र ठरेल.चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू या संकुलाच्या माध्यमातून ऑलिम्पिकसह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करू शकतील असा असा विश्वास बैठकीत राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला



बैठकीदरम्यान क्रीडामंत्री दत्तामामा भरणे यांनी या सकारात्मकता दाखवत दाताळा येथील वीर बाबुराव शेडमाडे स्टेडियमच्या क्रीडा संकुलाला प्रशासकीय मान्यता लवकरच दिली जाईल, असे आश्वासन दिले. क्रीडा क्षेत्राचा विकास हा राज्य सरकारच्या प्राथमिक उद्दिष्टांपैकी एक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.चंद्रपूर जिल्ह्यातील दाताळा येथे प्रस्तावित क्रीडा संकुलामुळे स्थानिक तसेच जिल्ह्यातील खेळाडूंना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. येथे ॲथलेटिक्स, फुटबॉल, हॉकी, कुस्ती, कबड्डी आणि विविध ऑलिम्पिक खेळांसाठी आवश्यक तांत्रिक व भौतिक सुविधा विकसित केल्या जाणार आहेत.राज्य सरकारच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील युवा खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळणार आहे. भविष्यातील ऑलिम्पियन आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवण्यासाठी हे संकुल अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे.या निर्णयामुळे क्रीडाप्रेमीमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला असून, चंद्रपूर जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला नवा उभारी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा

# आ.सुधाकर अडबाले यांची शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत वित्त विभागाने दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन निर्णय काढला. यावर शालेय शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय न काढल्याने शिक्षक - कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची भावना असल्याने तात्काळ शालेय शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय काढून शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. मुंबई येथे सुरु असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान शिक्षण मंत्री दादाजी भुसे साहेब यांची आमदार सुधाकर अडबाले यांनी भेट घेतली. यावेळी आयुक्त (शिक्षण) सचिंद्र प्रताप सिंह उपस्थित होते.

दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/




अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. परंतु, जिल्हा परिषद / खासगी अनुदानित / अंशतः अनुदानित शाळेत कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सदर शासन निर्णय लागू झालेला नाही. त्यामुळे वित्त विभागाने दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी काढलेल्या दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचा शालेय शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय काढण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदन दिले. तसेच नगर परिषद भंडारा येथील बऱ्याच वर्षांपासून संच मान्यता दुरुस्ती प्रकरण व विदर्भातील ज्या संच मान्यता दुरुस्ती प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी आयुक्त (शिक्षण) सचिंद्र प्रताप सिंह यांच्याशी सकारात्मक चर्चा केली.

## विद्यार्थ्यांसाठी सर्वात मोठी बातमी

# राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय, मंत्री दादा भुसे यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी):** आगामी शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येत असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज सभागृहात दिली. आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीला लागावी यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे दादा भुसे यांनी म्हटले आहे. राज्य अभ्यासक्रमाच्या आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संबंधित सुकाणू समितीने देखील मान्यता दिली असल्याची माहिती दादा भुसे यांनी विधान परिषदेत प्रश्नावर लेखी उत्तर देताना दिली आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी यासंबंधी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले आहे. यानुसार राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण



मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याला सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करून दिली जाणार असून एक एप्रिल पासून नवीन सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या विषयीच्या चर्चेला उत्तर मिळाले आहे.

# महाकाली यात्रा व वैद्यकीय सोयीसुविधांविषयी गांभीर्याने कार्यवाही करा-हंसराज अहीर

## येत्या १५ दिवसात पुन:आढावा घेण्याचे अहीरांचे सुतोवाच

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर महानगरपालिका, केपीसीएल, जिल्हा सामान्य रूग्णालय तसेच पुरातत्व विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न, समस्या व सोयीसुविधांबाबत राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दि. १८ मार्च २०२५ रोजी आढावा बैठक घेवून उपस्थित अधिकाऱ्यांना समस्या निवारणार्थ तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देतांनाच येत्या १५ दिवसात या संदर्भातील कार्यपुर्तीविषयी बैठकीच्या माध्यमातून पुनःआढावा घेतला जाईल असे सुचित केले . चंद्रपूर येथील शासकीय विश्रामगृहात प्रलंबित विविध समस्या व कार्य अहवाल संदर्भात आयोजित आढावा बैठकीस जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा खनिकर्म अधिकारी नैताम, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, मनपा मुख्य अभियंता बोरीकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चिंचोळे, पुरातत्व विभागाचे अधिकारी कोरे यांचेसह भाजपाचे माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार, भाजपा नेते तुषार सोम, राहुल सुर्यवंशी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीस संबोधित करतांना हंसराज अहीर यांनी जिल्हाधिकारी यांना मायनिंग प्रोजेक्टमध्ये पुनर्वसन व खनन नियमांचे तंतोतंत पालन करण्याविषयी सुचित केले. प्रचलित धोरण व



नियमास डावलून कोळसा उत्खनन सुरू असल्यामुळे जमीन अधिग्रहण, पुनर्वसन, रोजगार या बाबींची पुर्तता होईस्तोवर उत्खननास स्थगिती द्यावी अशा सुचनाही त्यांनी केल्या. केपीसीएल बाबत वनविभागाने कोळसा खनन बंदीची कारवाई करीत आहेत. जिल्हाप्रशासनाने सुध्दा नियमबाह्य होत असलेल्या खाणींवर कारवाई करावी तसेच अरबिंदो, आरसीसीपीएल यांचेवर सुध्दा नियमाप्रमाणे कार्रवाई करण्याच्या सुचना केल्या.

अमृत पाणीपुरवठा योजनेच्या जुन्या कंत्राटदारावर कारवाई करून त्यास काळ्या यादीत टाकण्याच्या वारंवार सुचना करूनही मनपा प्रशासनाने त्या कंत्राटदारावर कारवाई करण्यास हलगर्जीपणा दाखवित हेतु पुरस्सर विलंब लावल्याबद्दल अहीर यांनी नापसंती व्यक्त केली. मनपाने सदर कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याची शीघ्र कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. महाकाली यात्रेच्या पार्श्वभुमीवर यात्रेकरूंची नंदीग्राम एक्सप्रेसमुळे यंदा संख्येमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता असल्याने त्यादृष्टीने योग्य नियोजन करून यात्रेकरूंना प्रभावीपणे सोयीसुविधा उपलब्ध कराव्या. या बैठकीत अहीर यांनी मनपा व जिल्हा प्रशासनाच्या पूर्व तयारीचा आढावा सुध्दा घेतला.महाकाली यात्रेकरूंना चांगल्या सुविधा पुरविण्यावर भर देण्याची तसेच गुरूद्वारामागे यात्रा सुरू होण्यापूर्वी दोन बंधारे बांधून यात्रेकरूंच्या स्नान व अन्य सोयीसुविधांची व्यवस्था करावी अशी सुचना करीत तातडीने अंमलबजावणीच्या तसेच सिवरेजकरिता शहरातील अनेक रस्ते खोदल्याने नागरिकांना प्रचंड त्रास होत असल्याने या रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करण्याची सुचनाही अहीर यांनी मनपा प्रशासनास केली. जिल्हा सामान्य रूग्णालयातील विविध समस्या आणि अस्वच्छतेबाबत बिकट परिस्थिती असल्याने सफाई कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून रूग्णालयात कायम स्वच्छता राहील याची दक्षता घेण्याचे तसेच पेयजलाची व्यवस्था, अमृत दीनदयाल मेडिकल स्टोर्समध्ये आवश्यक औषधीसाठा उपलब्ध राहील याकडे विशेष लक्ष देण्याचे व रक्त तपासणीकरिता एन.ए.टी. मशीन (न्युक्लीक ॲसिड टेस्ट) करीता जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश अधिष्ठाता व जिल्हा शल्य चिकित्सकांना दिले. पुरातत्व विभागाशी निगडीत बाबींवर चर्चा करतांना हंसराज अहीर यांनी परकोटालगत असलेल्या ज्या जुन्या घरांना प्रधानमंत्री आवास योजनेंर्तगत घरकुलाचा लाभ मंजूर अशा नागरिकांना नाहरकत प्रमाणपत्र जारी करण्याचे निर्देश पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. स्वमालकीच्या जागेवर ज्यांची घरे आहेत त्यांना परवानगी देण्यास प्राधान्य देण्याची सुचनाही यावेळी संबंधितांना केली.

## मुंबईतील बिल्डर्स आणि ठेकेदारांनी बांगलादेशी नागरिकांना कामावर ठेवू नये-गृहराज्यमंत्री योगेश कदम



**मुंबई (प्रतिनिधी):** मुंबईत बांगलादेशी नागरिकांना कामावर ठेवू नका, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिला आहे. बिल्डर्स आणि ठेकेदारांनी अशा व्यक्तींना नोकरी दिल्यास, त्याची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे निर्देश त्यांनी विधानसभेत दिले.

संपूर्ण देशभरात अवैध प्रवाशांविरोधात कारवाई सुरू असताना, मुंबई आणि ठाणे परिसरात पोलिस आणि श्रम विभागाने बिल्डर्स आणि ठेकेदारांची चौकशी केली. मात्र, माहिती मिळवण्यात विलंब झाल्याचे योगेश कदम यांनी सांगितले.गृहराज्यमंत्र्यांनी माहिती दिली की, २०२४ साली महाराष्ट्रात २०२ बांगलादेशी नागरिकांना अटक करून निर्वासित करण्यात आले. मात्र, पश्चिम बंगाल सरकारकडून सहकार्य न मिळाल्याने अनेकांना परत पाठवणे कठीण झाले आहे.भाजप आमदार मनिषा चौधरी यांनी बांगलादेशी घुसखोरांविरोधात राज्य सरकारने केलेल्या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना योगेश कदम यांनी बिल्डर्स आणि ठेकेदारांना कडक इशारा देत भविष्यात या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

## कोलगांव वासियांकडून हंसराज अहीर यांचा भव्य नागरी सत्कार

# शेतकऱ्यांनी शेती धंदा जोपासावाशेतकरी असल्याचा अभिमान बाळगावा-हंसराज अहिर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर नॉर्थ वेस्ट प्रकल्पातील, कोलगांव येथील सर्व उर्वरित जमीन प्रकल्पग्रस्तांचे वतीने शेतकऱ्यांचे कैवारी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांचा भव्य नागरी सत्कार दि. १७ मार्च रोजी संपन्न झाला याप्रसंगी माजी आमदारद्वय ॲड. संजय धोटे व सुदर्शन निमकर, वाघुजी गेडाम, राजु घरोटे, कोलगांवच्या सरपंच अनिताताई पिंपळकर, उपसरपंच पुरुषोत्तम लांडे, मधुकर नरड, अरूण मस्की, संजय पावडे व अन्य पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

धोपटाळा भुमिगत ते खुली खाण प्रकल्पाकरिता ८१० हेक्टर जमीन अधिग्रहीत झाली ज्यामध्ये घोपटाला, सास्ती, भडंगपूर सह कोलगांव येथील जवळपास २४५ हेक्टर जमीन अधिग्रहण झाली. परंतु उर्वरित ३३७ हेक्टर जमीन शिल्लक राहिली होती व मुळ प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पातील डम्पिंग व वर्धानदी लागून असल्यामुळे वारंवार निर्माण होणारी पूर परिस्थिती यामुळे उर्वरित जमिनीवर शेती करणे हे केवळ अशक्य होणार होते आणि गावकऱ्यांसाठी सुध्दा ही गोष्ट संभाव्यतः प्राणहानिकारक उरणारी होती विद्यमान उपसरपंच पुरुषोत्तम लांडे व सर्व गावकऱ्यांनी अहीर यांचे समक्ष ही समस्या उपस्थित केली व उर्वरित शेतीचे अधिग्रहण व गावाचे पुनर्वसन या दोन्ही समस्या अतिशय ताकदीने लावून धरल्या.अहीर यांनी उर्वरित शेतजमिनीच्या समस्येला व भविष्यात गावकऱ्यांच्या जीविताला होणारा संभाव्य धोका ओळखून तात्काळ वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा केला. धोपटाला भुमिगत ते खुली खाण हा मुळ प्रकल्पच सेक्शन ९ होऊनही व्यवहार्य ठरत नसल्यामुळे खुप मोठी अडचण या प्रकल्पात आणि गावासाठी निर्माण झाली होती. परंतु शेतकऱ्याचे खरे कैवारी असलेले अहीर यांनी कोल मंत्रायल, कोल इंडिया, वेकोलि मुख्यालय क्षेत्रीय कार्यालय या स्तरावर वारंवार बैठका घेऊन, कॉस्ट प्लसच्या कारणाने अडकलेला मूळ प्रकल्प वेकोलि बोर्डातून पास करवून घेतला.



त्यातील आर्थिक मोबदला, नोकरीचे फायदे या गोष्टी शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या व सोबतच उर्वरित कोलगांव जमीन अधिग्रहण व गाव पुनर्वसन या विषयासाठी सतत वरिष्ठ पातळीवर बैठका घेऊन बल्लारपूर नॉर्थ वेस्ट या प्रकल्पात ३६० हेक्टर अधिग्रहीत जमिनीत कोलगांव येथील ३३७ हेक्टर जमीन घेण्यास वेकोलिस भाग पाडले.

या भीष्म कार्यासाठी कृतज्ञ शेतकऱ्यांनी अहीर यांचा गावात भव्य मिरवणूकीसह, नागरी सत्कार करून शेतकऱ्यांचे प्रतिक असलेला चांदीचा नांगर, शाल, श्रीफळ आणि भव्य हार घालून सत्कार केला. यावेळी प्रास्ताविकातून कोलगांवचे उपसरपंच पुरूषोत्तम लाडे यांनी समस्त गावकऱ्यांसमोर काही वर्षांपूर्वी प्रतिपादन केल्यानुसार, मुळ प्रकल्प यशस्वी करणे, उर्वरित जमीन अधिग्रहण करणे, गावाचे पुनर्वसन करणे या संपूर्ण कार्यासाठी गावाचे वतीने अहीर यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.अहीर यांनी यावेळी, मागील २५ वर्षांपासून आपण सतत शेतकऱ्यांसाठी मैदानात असून, भविष्यात देखील पूर्ण ताकदीनिशी पाठीशी राहण्याचे उद्‌घोषित केले तसेच या जमिनी आपण वडीलोपार्जितरित्या कसत आलेलो आहोत, आपणांपैकी कोणीही व्यापार किंवा सावकारी पध्दतीने जमिनी हडपून मालक झालेलो नाही, आपणा सर्वांची नाळ जमिनीशी जुळलेली आहे. त्यामुळे आपण खरे शेतकरी असल्याचा अभिमान बाळगून गावकऱ्यांनी जरी संपूर्ण शेती अधिग्रहीत झाली असली तरी शेतकरी पुत्रांनी आपले शेतीचे कौशल्य लोप न पावण्यासाठी अधिग्रहणातून मिळणाऱ्या आर्थिक मोबदल्याच्या बदल्यात दुसरीकडे शेती घेवून शेतकरी असल्याचा आत्मसन्मान बाळगावा व कृषीप्रधान देशाची सर्वचा सेवा करावी. भविष्यात अधिग्रहीत जमिनीसाठी वाढीव दर मागण्याचे सुतोवाच सुध्दा अहीर यानी केले.कार्यकमाचे संचालन प्रदीप बोबडे यांनी केले तर यावेळी ॲड. प्रशांत घरोटे व माजी आमदारद्वय ॲड. संजय धोटे व सुदर्शन निमकर यांचे सत्कारपर भाषण झालीत.

# सेंट जॉन हायस्कूल पुलगांव मध्ये लिटल चॅम्प ऑलिम्पिड परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन प्रायमरी व हायस्कूल पुलगाव येथे दि. ०९/११/२०२४ ला प्रथमच सिल्वर झोन फाऊंडेशन, नवी दिल्ली यांच्या माध्यमाने प्रायमरी म्हणजेच वर्ग के. जी - ० ते के. जी - २ च्या विद्यार्थ्यांमध्ये लिटल चॅम्प ऑलिम्पिड परीक्षा गणित या विषयात घेण्यात आली. या परीक्षेला आपल्या सेंट जॉन प्रायमरी च्या विद्यार्थ्यांनी रस दाखवत अत्यंत उत्कृष्टपणे भरारी घेत यश संपादन केले. शाळेचे शिक्षक व शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी पुढाकार घेण्यास सांगितले. तसेच दि. २०/०३/२०२५ ला उपस्थित मान्यवर शाळेचे प्राचार्य श्री. संतोष यादव सर, उपप्राचार्या सौं. आरती कुरझडकर मॅडम यांच्या हस्ते यशप्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.




आश्चर्यची बाब म्हणजे या मध्ये आपल्या शाळेच्या ९ विद्यार्थ्यांनी सुवर्ण, १८ विद्यार्थ्यांनी रौप्य व २ विद्यार्थ्यांनी कास्य पदकावर आपले नाव कोरले. शाळेचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना सिल्वर झोन ऑलिम्पिड ही आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे व आपले विचार जागतिक स्तरावर आपले नाव कसे कोरावे तसेच उपप्राचार्या यांनी विद्यार्थ्यांना या परीक्षेत कौशल्य विकास निर्माण व गंभीर विचारसरणी निर्माण होतात आणि ही स्पर्धा आपल्यासाठी प्रेरणादायी साधन आहे असे सांगितले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना या परीक्षा कृत्रिम बुद्धिशी संबंधित आहे असे सांगितले. शाळेच्या अध्यक्षा सौं. प्रीती बोरसे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस एक प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सौं. कोकीला नावाडे मॅडम यांनी केले. शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना खूप अचूक मार्गदर्शन केले.

# गुरूमंदिर आणि पोहरादेवी तीर्थक्षेत्र विकासासाठी ७२३ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत वाशिम जिल्ह्यातील गुरूमंदिर तीर्थक्षेत्रासाठी १७० कोटी आणि श्री संत सेवालाल महाराज पोहरादेवी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी ५५३ कोटी अशा एकूण ७२३ कोटींच्या निधीला मंजुरी देण्यात आली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी तीर्थक्षेत्र विकास आराखडच्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामविकास, पर्यटन आणि संबंधित विभागांनी सुधारित नियमावली तयार करण्याचे निर्देश दिले. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन कमी खर्चात उच्च दर्जाची कामे करण्यात यावीत आणि तीर्थक्षेत्रांचा सर्वसमावेशक विकास करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तशी कार्यवाही करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.तीर्थक्षेत्र विकास केवळ धार्मिक पर्यटनासाठी नव्हे, तर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठीही महत्त्वाचा असतो. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीसाठी सामाजिक आणि आर्थिक घटकांचा विचार करावा, मंजूर प्रकल्पांना गती देण्यासाठी संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, तसेच प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रभावी देखरेख ठेवावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले.या बैठकीत नागपूरमधील महत्त्वपूर्ण धार्मिक प्रकल्पांनाही मंजुरी देण्यात आली. यामध्ये नंदनवन ले-आऊट येथील लक्ष्मीनारायण आणि शिवमंदिर परिसराचे सुशोभीकरण व पुनर्विकास, भांडेवाडी येथील श्री मुरलीधर मंदिराचा तीर्थक्षेत्र विकास आणि शांतीनगर येथील कुत्तेवाला आश्रमाच्या सुशोभीकरणाचा समावेश आहे.बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार संजय देशमुख, आमदार सईताई प्रकाश डहाके, तसेच अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, जिल्हाधिकारी आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# शिवरायांचे विचार आचरणात आणण्याची गरज-ॲड.सुरेंद्र खर्डे

**कोल्हार । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व समाजघटकांना एकत्र आणून स्वराज्याची स्थापना केली. मात्र, सध्याच्या परिस्थितीत जातीय तणाव वाढत असून, समाज एकमेकांच्या विरोधात उभा ठाकला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून द्वेष पसरवला जात आहे. अशा परिस्थितीत शिवरायांचे विचार आचरणात आणण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच ड. सुरेंद्र खर्डे यांनी केले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपजिल्हाप्रमुख अनिल बांगरे यांच्या वतीने कोल्हार भगवतीपूर येथे तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भगवती देवीच्या नव्याने बांधलेल्या भव्य स्वागत कमानीजवळ मराठमोळ्या सनई-चौघड्यांच्या निनादात शिवप्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी



कोल्हार भगवतीपूरचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, ज्ञानेश्वर खर्डे, अनिल खर्डे, धनंजय दळे, पंढरीनाथ खर्डे, अजित मोरे, वसंत खर्डे, अनिल हिरानंदानी, आबा खर्डे, स्वप्निल लोखंडे, अक्षय मोरे, श्याम लोखंडे, संतोष थेटे, संदीप खर्डे आदी मान्यवर उपस्थित होते.शिवजयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सागर मोरे, विजय गोहर, पप्पू जोर्वेकर, विजय मोरे, सागर बांगरे, युवराज बांगरे, नंदू वाकचौरे, मोहित भोंडे यांनी विशेष प्रयत्न केले.ड. सुरेंद्र खर्डे यांनी गावातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन एकोपा आणि सलोखा टिकवावा, जातीय तेढ गावाच्या वेशीवर ठेवावी, असे आवाहन केले.

# साईनामाच्या गजराने पुलगाव नगरी दुमदूमली

**पुलगाव । प्रतिनिधी**

असंख्य साई भक्त नागपूर ते शिर्डी साईधामला पालखीसह चालत जात आहे.साई पालखीचे पुलगाव नगरीत आगमनानंतर एकता चौकात साई बाबा भक्तांचे जोशात स्वागत करण्यात आले.नगरात ठिक ठिकाणी स्वागत, भजन गायन, प्रसाद, नास्ता, सरबत वितरण करण्यात आले. यात शहरातील विविध सामाजिक व धार्मिक संघटनांनी सहभाग घेतला.

यावर्षीही २२ वर्षांच्या परंपरेनुसार, नागपूर येथून शिर्डीला जाणाऱ्या साई पालखीचे आगमन केंद्रीय दारूगोळा भंडाराच्या गेटवर होताच साई भक्त, लष्करी अधिकारी व सैनिक तेथे उपस्थित होते. त्यांनी साईबाबांचा जयजयकार करत पालखीतील मुर्तीचे पुजन केले, पुष्पावर्षा केली.भक्तांना प्रसाद वितरण केले एकता चौक मित्र मंडळ आणि केबल नेटवर्क मित्र मंडळाने भजन संध्या व रक्तदान



शिबिराचे आयोजन केले होते. पायी वारी करणाऱ्या सर्व साई भक्तांचे गंध लावून व साई नामाचे दुपट्टे देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर महाआरती करण्यात आली व सर्व उपस्थितांना महाप्रसाद देण्यात आला. महाआरतीच्या महाप्रसादचे आयोजन केले गेले आणि महाप्रसादचे वितरण केले गेले.बस स्टँड परिसर, आठवडी बाजार संकुल, भगतसिंह चौक मार्गे गांधी चौकात पोहोचले, जिथे असंख्य साई भक्तांनी साई पालखीचे पुजन व स्वागत केले. तुकडोजी चौक, फुटाणा लाईन, दीनदयाल चौक, बालाजी मंदिर मार्गे ठिकठिकाणी पालखीचे पुजन व प्रसाद वितरण करण्यात आले.हरीराम नगर मध्ये साई सेवा दल व शिवाजी महाराज शोभायात्रा समितीने पुष्पवर्षा, पालखी पुजन, स्वागत केले.येथे मोठ्या प्रमाणावर महिला, बालगोपाल व नागरिकांनी सडा, रांगोळी ने परिसर सुशोभित केला व साईचा जयजयकार करत पालखीला वंदन केले. व्यवसाय पालखीच्या मिरवणुकीचा समारोप श्री साईबाबा देवस्थान करण्यात आला. साईबाबा देवस्थान ट्रस्ट मध्ये भक्तांनी गर्दी केली. साईबाबा देवस्थान ट्रस्ट पदाधिकाऱ्यांनी पालखीचे स्वागत केले. या ठिकाणी आरती करण्यात आली. मंदिर दिवे व फुलांनी तसेच रांगोळीने सजविण्यात आले होते. सर्व भक्तांना साईमहाप्रसादी देण्यात आली.पालखिचा येथे मुक्काम असतो.

# ज्येष्ठ नाभिक समाजसेवक आबासाहेब उर्फ तुकाराम सोनवणे यांचे दुःखद निधन

**ठाणे । प्रतिनिधी**

नाभिक समाजातील ज्येष्ठ समाजसेवक,श्री संत सेनाजी महाराज प्रगती मंडळाचे ज्येष्ठ सल्लागार तथा माजी अध्यक्ष,खानदेश भूषण,आणि आनंद वधुवर विवाह ग्रुपच्या माध्यमातून महाराष्ट्र,गुजरात आणि मध्यप्रदेशातील हजारो जोडप्यांच्या जीवनात वैवाहिक आनंद खुलविणारे अक्षदाचार्य आबासाहेब उर्फ



तुकाराम झिपा सोनवणे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी बुधवार दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले.काल गुरुवार दिनांक २० रोजी सकाळी १० वाजता ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियम जवळील जवाहर बाग मुक्तीधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी धुळे,जळगाव जिल्ह्यासह मुंबई,ठाणे आणि राज्याच्या विविध भागातील नाभिक बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.त्यांचा दशक्रिया विधी ठाण्यातील कोपिनेश्वर मंदिरात शुक्रवार दिनांक २८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता होणार असून अक्षगंध विधी त्यांच्या ठाण्यातील नक्षत्र गॅलेक्सी, लोढा सर्व्हिस रोड माजीवडा या निवासस्थानी होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने सांगण्यात आले आहे.दरम्यान तुकाराम सोनवणे यांच्या आकस्मित निधनाने नाभिक समाजाची कधीही भरून न निघणारी खुप मोठी हानी झाली आहे,समाजाने एक कोहिनूर हिरा गमावला तथा असा समाजसेवक पुन्हा होणार नाही अशा प्रकारच्या दुःखद भावनांनी यावेळी नाभिक समाजातील विविध मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी पुष्पाताई,मुलगी माधुरी बोरसे असा परिवार असून सुप्रसिद्ध टीव्ही मालिका दिग्दर्शक आणि व्यवस्थापक हेमंत सोनवणे यांचे ते वडील होते.

# जमनालाल बजाज सेवा ट्रस्टकडून वाघोली-धाबा नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरणास सुरुवात

**वर्धा । प्रतिनिधी**

आज वाघोली गावातून वाहणाऱ्या नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरणाचा शुभारंभ शेतकऱ्यांच्या लोकसहभागातून करण्यात आला. वाघोली ते धाबा दरम्यानच्या या नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरणाचे काम जमनालाल बजाज सेवा ट्रस्टच्या वतीने हाती घेण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला जमनालाल बजाज फाउंडेशनचे भार्गवजी, वना नदी संवर्धन समितीचे अध्यक्ष रुपेश राजूरकर, प्रवीण भोंगाडे, बजाज फाउंडेशनचे कॉन्ट्रॅक्टर नरेश काचवे आदी मान्यवर उपस्थित होते.



गेल्या अनेक वर्षांपासून या नाल्याचे पाणी वाघोली परिसरात मोठ्या प्रमाणात जिरत असल्यामुळे दरवर्षी येथील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत होते. यामुळे नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण होणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक बाब आहे.या उपक्रमामुळे भविष्यात पाण्याचा निचरा सुरळीत होईल व पाणी जिरण्याचे प्रमाण कमी होईल, असे अपेक्षित आहे. यामुळे शेतीला पुरेसा लाभ मिळेल आणि शेतकऱ्यांचे नुकसान कमी होईल.

# सक्षम पिढी घडविण्यासाठी कृष्णाली फाउंडेशनचे दिशादर्शक कार्य-खा.लंके

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

शिक्षण हे देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरवून त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे ही समाजाची जबाबदारी आहे, असे मत खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केले.कर्जुने खारे (ता. नगर) येथे कृष्णाली फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील १००१ विद्यार्थ्यांना मोफत परीक्षा पॅडचे वाटप करण्यात आले. यावेळी खासदार निलेश लंके यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी ड. राहुल झावरे, अशोक रोहकले, कृष्णाली फाउंडेशनचे उपाध्यक्ष अमोल शिंदे, लोकहितवादी प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अंकुश शेळके, सचिव प्रियंका पाटील शेळके, अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, श्रीकांत बोरुडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास लांडे, मुख्याध्यापक बबन नरवडे तसेच अलका येणारे, सुप्रिया देशमुख, वैशाली गुंडू, सविता नरोटे, मंदाकिनी शिंदे, सुमित दरंदले, देशमुख मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.खासदार निलेश लंके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सक्षम पिढी घडविण्यासाठी कृष्णाली फाउंडेशनने हाती घेतलेला उपक्रम दिशादर्शक आहे. आजची मुलं देशाचे भवितव्य आहेत आणि त्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे.प्रशांत पाटील शेळके यांनी फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीबाबत माहिती देताना सांगितले की, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण क्षेत्रात मोठे कार्य करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.प्रियंका पाटील शेळके यांनी सांगितले की, नगर जिल्ह्यासह तालुक्यातील अनेक शाळांमध्ये मोफत परीक्षा पॅड वाटप करण्यात येणार आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा वाढता कल असला तरी मराठी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा मिळणार असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.




# राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत पुणे व धाराशिव विजेते



**शिरूर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथे झालेल्या हिरक महोत्सवी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत पुरुष गटात पुणे संघाने आणि महिला गटात धाराशिव संघाने अजिंक्यपद पटकावले.पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात पुणे संघाने मुंबई उपनगर संघाचा पराभव करत सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद मिळवले. महिला गटात धाराशिव संघाने सांगली संघावर ११-१० अशा एका डाव आणि एका गुणाने विजय मिळवला.

स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. शुभम थोरात (पुणे) याला 'छत्रपती संभाजी राजे पुरस्कार', तर संध्या सुरवसे (धाराशिव) हिला 'राणी अहिल्याबाई पुरस्कार' प्रदान करण्यात आला.अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर) आणि अश्विनी शिंदे (धाराशिव) यांना उत्कृष्ट संरक्षक पुरस्कार, तर सुरेश गरगटे (पुणे) आणि सानिका चाफे (सांगली) यांना उत्कृष्ट आक्रमक पुरस्कार देण्यात आला.पिंपरी दुमाला गावातील अनिकेत आणि साहिल यांनी चमकदार कामगिरी करत राज्य संघात स्थान मिळवले. त्यांच्या यशाने गावात आनंदाचे वातावरण आहे.

## सत्यवादी इतिहास संशोधक हरपला

# गंगाखेड येथे श्रद्धांजली सभेत विलासराव जंगले यांचे मनोगत

**गंगाखेड | प्रतिनिधी**

प्रख्यात इतिहास संशोधक व प्रसिद्ध प्रबोधनकार मा. म. देशमुख यांचे दि. १९ मार्च रोजी पहाटे ३:३० वाजता त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. नागपूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या इतिहासतज्ज्ञाच्या निधनाने सत्य लिखाण व प्रबोधनाच्या क्षेत्रातील मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विलासराव जंगले यांनी गंगाखेड येथे आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात केले.

या श्रद्धांजली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. अंकुश वाघमारे यांनी भूषवले. यावेळी बार्टीचे मुंजाजी कांबळे, उपाध्यक्ष नारायण साळवे, ॲड. उत्तम काळे, गुणवंत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते राठोड, मिलिंद साळवे, राहुल काचोळे, प्रसंगीत मस्के, कैलास सावंत, प्रभाकर गायकवाड, टायगर मस्के, बाळासाहेब कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.मा. म. देशमुख यांच्या संशोधनात्मक कार्यामुळे इतिहासप्रेमींसाठी ते प्रेरणास्थान होते. त्यांचे योगदान अजरामर राहील, अशा शब्दांत उपस्थित मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## मुजोर रेती माफियांची दादागिरी

# तलाठ्यांनी पकडलेला ट्रॅक्टर चालकाने पळवला

**पाथरी | प्रतिनिधी**

पाथरी तालुक्यातील नाथरा येथे अवैध रेती उत्खनन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने अधिकाऱ्यांच्या कारवाईला धुडकावून ट्रॅक्टर पळवण्याची घटना घडली. तलाठी सय्यद साजिद हारुण आणि राजू गोरक्षण नरवटे यांनी पकडलेला अर्धा ब्रास रेती भरलेला ट्रॅक्टर चालकाने जबरदस्तीने ताब्यात घेत पळ काढला.

दि. १८ मार्च रोजी सकाळी ८:५० वाजता नाथरा सज्जाचे तलाठी सय्यद साजिद हारुण आणि पाथरी येथे कार्यरत तलाठी राजू गोरक्षण नरवटे यांना गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यांनी घटनास्थळी पोहोचून तपासणी केली असता सिल्व्हर रंगाच्या, नंबर नसलेल्या आयशर कंपनीच्या ट्रॅक्टरमध्ये रेती भरली जात असल्याचे आढळले.यावेळी तलाठ्यांनी विचारपूस सुरू केली असता महारुद्र इंद्रजीत पहाडे (रा. नाथरा) हा घटनास्थळी आला आणि हे ट्रॅक्टर माझे आहे, तुम्ही का विचारपूस करता? असे म्हणत तलाठ्यांसमोरच भरलेला ट्रॅक्टर जबरदस्तीने पळवून नेला.या घटनेनंतर तलाठी सय्यद साजिद हारुण यांनी पाथरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार महारुद्र इंद्रजीत पहाडे याच्यावर बी.एन.एस. १३२, ३०५, ४८(७), ४८(८) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे अवैध वाळू माफियांना रोखण्याच्या कारवाईला जाणीवपूर्वक अडथळा आणला जात असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# नऊ वर्षीय आतिफ अन्सारीने पूर्ण केला पहिला रोजा-कौतुकाचा वर्षाव

**पाथरी | प्रतिनिधी**

माजी नगरसेवक गुलाम अहमद अन्सारी यांचे नातू आणि मुस्तफा अन्सारी यांचा नऊ वर्षीय मुलगा आतिफ अन्सारी याने कडक उन्हाळ्यात इस्लाम धर्मानुसार आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला. या निमित्ताने त्याच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.



या खास प्रसंगानिमित्त मुस्तफा अन्सारी यांच्या वतीने सायंकाळी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार बाबाजाणी दुराणी, माजी नगराध्यक्ष जुनेद खान, हबीब अन्सारी, मिर्झा रशीद बेग, बबलू कुरेशी, मलिक पटेल, हबीब कुरेशी, खुर्शीद शेख तसेच कुटुंबीय आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. आतिफच्या दृढ इच्छाशक्तीचे आणि धर्मनिष्ठेचे सर्वत्र कौतुक होत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# बांधकाम कामगारांची पायपीट थांबली!

## तालुकास्तरावरच होणार सर्व कामे

**मूल | प्रतिनिधी**

महाराष्ट्रीयन इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ योजनेअंतर्गत कामगारांना शासनाकडून विविध सवलती देण्यात येतात. याआधी या कामांसाठी कामगारांना जिल्हा कार्यालयात जावे लागत होते. मात्र, आता शासनाने नोंदणीपासून नूतनीकरणापर्यंतची सर्व कामे तालुकास्तरावर उपलब्ध करून दिली असून, त्यामुळे कामगारांचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना १ जुलै १९५३ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार झाली. १८ ते ६० वयोगटातील आणि मागील वर्षात ९० दिवसांपेक्षा जास्त बांधकाम क्षेत्रात काम



केलेल्या कामगारांना नोंदणीसाठी पात्र मानले जाते. नोंदणीकृत कामगारांना स्मार्ट कार्ड दिले जाते, जे विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक आहे.

या योजनेतून कामगारांना सुरक्षा, आरोग्य, वैद्यकीय मदत, अपघात विमा, पेन्शन, मुलांसाठी शैक्षणिक मदत यांसारख्या सुविधा मिळतात. पूर्वी ही सर्व कामे जिल्हास्तरावर होत असल्याने कामगारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. कामगारांची गैरसोय लक्षात घेऊन शासनाने तालुका स्तरावर कार्यालय स्थापन करून नोडल ऑफिसरची नियुक्ती केली आहे. त्यांच्या माध्यमातून नोंदणी, नूतनीकरण, क्लेम आणि कागदपत्र तपासणी यासारखी सर्व कामे तालुका स्तरावरच होत असल्याने कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.चालू वर्षात ४,००० कामगारांची नोंदणी झाली असून १५० अर्ज नूतनीकरणासाठी प्राप्त झाले आहेत. कार्यालयाकडे आलेल्या अर्जांची तपासणी करून पात्र कामगारांचे अर्ज पुढील मंजुरीसाठी जिल्हा कार्यालयाकडे पाठवले जात आहेत, अशी माहिती तालुका समन्वयक अधिकारी सौरभ तोडेवार यांनी दिली.या सुविधेमुळे कामगारांची मोठी गैरसोय दूर झाली असून, त्यांना शासनाच्या विविध योजनांचा अधिक चांगल्या प्रकारे लाभ घेता येणार आहे.

# देवळी येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षा तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**देवळी | प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने देवळी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शिवव्याख्याते प्रबोधनकार हरिभक्त प्रल्हाद संदेश आमटे यांचे शिवचरित्रावर आधारित प्रबोधनपर व्याख्यान होते. यानंतर देवीचा जागर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा जिल्ह्याचे खासदार अमर काळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वर्धा जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख आशिष पांडे, युवा संघर्ष मोर्चा देवळी अध्यक्ष किरण ठाकरे, माजी जिल्हाप्रमुख अशोक काकडे, कृषी योद्धा अमोल ठाकरे, माजी तालुकाप्रमुख रमेश कडू, उपजिल्हाप्रमुख संजय कपूर, तालुका संघटक संजय कपूर, तसेच विनोद गुल्हणे, देविदास लांडे, प्रमोदभाऊ गुल्हाने, उमेश मडावी, हर्षल गायकवाड, नाना बेलखेडे, संजय पोटदुखे, नितीन वाघ, संभाव इंगोले, आकाश डगवार, नितेश भानारकर, गजानन कामडी, राहुल देशमुख, राहुल रोंडे, मोहन कडू, सागर वरके, दिनेश काकडे, प्रशांत देशमुख, अनिकेत बुट्टे, निखिल सडमाके, प्रमोदराव वानखेडे, सचिन चौधरी, योगेश ढाकुलकर, गोपाल तिवारी यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व देवळी शहरातील नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी छत्रपती शिवाजी महाराज की जय या जयघोषाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# वर्धा येथे नाफेड तूर खरेदीचा शुभारंभ

## शेतकऱ्यांना हमीभावाने तूर विक्रीचे आवाहन



**वर्धा | प्रतिनिधी**

शासनाने निश्चित केलेल्या तुरीच्या हमीभावापेक्षा सद्यस्थितीत बाजारभाव कमी असून, यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. शासनाने तुरीचा हमीभाव ७५५० रुपये प्रति क्विंटल निश्चित केला आहे, मात्र सध्या बाजारात तुरीचा दर ७००० ते ७२०० रुपये दरम्यान असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आपली तूर हमीभावाने विक्रीसाठी पुढे यावे, असे आवाहन वर्धा तालुका खरेदी विक्री समितीचे सभापती पंकज र. घोडमारे यांनी केले आहे. यासाठी शेतकऱ्यांनी तात्काळ तालुका खरेदी विक्री समिती वर्धा कार्यालयात जाऊन ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी, असेही ते म्हणाले.

दरम्यान, वर्धा तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डवर नाफेड तूर खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी उपस्थित शेतकरी मारोत वाघमारे यांच्याकडून तूर खरेदी करून शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास खरेदी विक्री समिती वर्ध्याचे सभापती मा. पंकज र. घोडमारे, उपसभापती मा. संदीप राऊत, सहाय्यक निबंधक सुचितताई गुघाणे , संस्थेचे ज्येष्ठ संचालक अनिल ठाकरे, संचालक रमेश गायकवाड, संदीप भांडवलकर, संतोष बोरकुटे, संस्थेचे व्यवस्थापक अशोक रणनवरे, भुषण मरघडे तसेच कृ.उ.बा. समितीचे संचालक मदनराव भुतडा, सचिव समीरराव पेंडके, राकेश तळवेकर, गणेश निंबाळकर व जि.मा.अ. कार्यालयाचे कर्मचारी संजय आबदेव, शिवम येडे तसेच हमाल, मापारी वर्ग व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्याचे आवाहन प्रमोद चौगुले, मुल पोलीस उपविभागीय अधिकारी

**मूल | प्रतिनिधी**

नागपूर शहरातील औरंगजेबाच्या कबरीवरून निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, नागपुरात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. या घटनेचे पडसाद इतरत्र उमटू नयेत म्हणून संपूर्ण राज्यभर प्रशासन सतर्क झाले आहे.

मुल येथेही संभाव्य परिस्थिती हाताळण्यासाठी १८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता पोलीस ठाण्यात शांतता कमेटीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी, सामाजिक व धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, एनजीओ तसेच विविध जाती-धर्मांतील नागरिक उपस्थित होते.बैठकीत मुल पोलीस उपविभागीय अधिकारी प्रमोद चौगुले यांनी उपस्थितांना संबोधित करताना मुल गावाचा शांततेचा इतिहास कायम राखण्याचे आवाहन केले. तसेच, सोशल मीडियावर भडकावू पोस्ट शेअर करणे टाळावे आणि अशा प्रकारच्या कोणत्याही पोस्ट लक्षात आल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाला कळवावे, जेणेकरून त्वरित कारवाई करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पोलीस प्रशासन व नागरिकांनी परस्पर सहकार्याने शांतता व सुव्यवस्था राखावी, सलोखा कायम ठेवण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी या बैठकीत केले.



### आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना नागरिकांचा पाठिंबा

# चंद्रपूरची जीवनदायिनी इरई नदीच्या संवर्धनासाठी आ.सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार

## आ.सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सादर केला विनंती अर्ज



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरचे पर्यावरण आणि पाणी पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या इरई नदीच्या संवर्धन व संरक्षणासाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी विधानसभेत अधिकृत विनंती अर्ज सादर केला असून विधानसभा अध्यक्षांनी तो समितीकडे पाठवला आहे.इरई नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने नदी उथळ झाली आहे आणि काटेरी झुडपांची वाढ झाली आहे. परिणामी, दरवर्षी पूरपरिस्थिती निर्माण होत आहे. पूर आल्यास शहरालगतच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरते आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होतो. तसेच, यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक हानीही होत आहे.आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण प्रश्नाच्या पाठोपाठ आता इरई नदीच्या संवर्धनाचा विषय विधानसभेत मांडला आहे. विधानसभा विनंती अर्ज समितीच्या माध्यमातून तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याचा मार्ग सुकर होईल, अशी अपेक्षा आहे.

विधानसभेत अनेक संसदीय उपाय उपलब्ध असतानाही काही समस्या दीर्घकाळ प्रलंबित राहतात. अशा वेळी विधानसभा विनंती अर्ज समितीचा पर्याय जनहितासाठी प्रभावी ठरतो. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सक्रिय प्रयत्नांमुळे या विषयावर ठोस निर्णय होण्याची शक्यता बळावली आहे.इरई नदी ही चंद्रपूरकरांची जीवनदायिनी असून, तिच्या संवर्धनासाठी प्रशासनाच्या उपाययोजनांबरोबरच नागरिकांचाही सक्रीय सहभाग आवश्यक आहे. नदी स्वच्छता मोहिमा, गाळ काढण्याच्या योजना आणि पूरनियंत्रण उपायांसाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे इरई नदीच्या संवर्धनासाठी उचललेला हा महत्त्वपूर्ण पाऊल चंद्रपूर जिल्ह्याच्या पर्यावरणीय आणि पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे या विषयावर चर्चा घडून येईल आणि आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी अपेक्षा आहे.आता विधानसभा विनंती अर्ज समिती या विषयावर कोणती कार्यवाही करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. इरई नदीचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी तात्काळ आणि प्रभावी निर्णय घेण्यात यावेत, अशी नागरिकांची मागणी आहे.

## आत्मा चंद्रपूर अंतर्गत शेतकरी अभ्यास दौरा दिल्लीला रवाना



**नेरी । प्रतिनिधी**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प, आत्मा चंद्रपूर आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या वतीने जिल्हा कृषी विभागाच्या आत्मा अंतर्गत जिल्हास्तरीय स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत शेतकरी अभ्यास व प्रशिक्षण दौरा दिल्लीसाठी रवाना झाला आहे.

या अभ्यास दौऱ्यात अग्रोटेक शिवाफेरी, खरीपपूर्व मेळावा, शेतकरी सुसंवाद आणि कृषी दिन या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच सेंद्रिय खतांचा प्रभावी वापर आणि टिकाऊ शेती तंत्रज्ञान यावर माहिती देण्यात आली.यावेळी कृषी विभागीय कार्यशाळेअंतर्गत 'कृषी स्वाधीन मार्गदर्शक पुस्तिका' वाटप करण्यात आली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कृषी विभागाचे वित्तीय सल्लागार नंदकिशोर काळे, प्रमुख अतिथी गणेश मादेवार आणि नोडल अधिकारी अक्षय घावट उपस्थित होते. यावेळी हरित सेना सदस्य महेश गिरडकर, संजय बोडणे, दुर्वास खोब्रागडे, शामराव बोरकर, यदुनाथ गिरडकर, केशव बनसोड, सुखदेव पर्वते, रविंद्र गिरडकर, रमेश बोरकर, विकास शर्मा, प्रथम ननावरे आदी मान्यवर उपस्थित होते. शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांनी शाळा व अंगणवाडीस दिली भेट, विद्यार्थ्यांशी साधला संवाद



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्याच्या अंमलबजावणीच्या उद्देशाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी चंद्रपूर तालुक्यातील सिदूर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आणि अंगणवाडी केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

यावेळी उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, संवर्ग विकास अधिकारी संगिता भांगरे, उपशिक्षणाधिकारी निवास कांबळे, विस्तार अधिकारी गीता चौधरी, केंद्र प्रमुख अतुल पोहाणे, निखील तांबोळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील मासीरकर, सरपंच मंजुषा मत्ते, मुख्याध्यापिका सुलोचना माहुरकर आदी उपस्थित होते.

शालेय मंत्रीमंडळाच्या वतीने मुख्यमंत्री उन्नती शेलवटे आणि सांस्कृतिक मंत्री संबोधी मोडक यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. स्काऊट-गाईड पथकाने त्यांना सलामी दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व वर्गांची पाहणी करत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांचे वाचन आणि मूलभूत गणित कौशल्य तपासले. शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेतली.

शाळेत राबविण्यात येणाऱ्या डिजिटल वर्गखोली, शालेय बचत बँक, गांडूळ खत निर्मिती, ज्ञानपुष्प विज्ञान कोडी यांसारख्या उपक्रमांची माहिती अविनाश जुमडे यांनी दिली. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर स्पर्धा परीक्षांबाबत प्रश्न विचारले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शालेय परिसर, विद्यार्थी गुणवत्ता आणि शालेय उपक्रमांचे कौतुक करत शाळेच्या मैदानासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच अंगणवाडीस भेट देऊन लहान मुलांसोबत संवाद साधला.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या संवादाला सकारात्मक प्रतिसाद दिला. ग्रामस्थ आणि शिक्षकांनीही शाळेच्या विकासासाठी प्रशासनाने घेतलेल्या पुढाकाराचे स्वागत केले.

## खिर्डी (हरगोविंदपूर) ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी ताईबाई तांबे यांची बिनविरोध निवड

**वैजापूर । प्रतिनिधी**

खिर्डी (हरगोविंदपूर) (ता. वैजापूर) येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी ताईबाई दत्तात्रय तांबे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच नवनाथ चांगदेव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली.माजी उपसरपंच शकुंतला तांबे यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. निवडणुकीत एकच अर्ज दाखल झाल्याने ताईबाई तांबे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.



निवडणूक अधिकारी म्हणून मंडळ अधिकारी आर. आर. पुरी, तलाठी आर. एस. जाधव आणि ग्रामविकास अधिकारी संभाजी कटारे यांनी काम पाहिले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रतिभा शिंदे, शकुंतला तांबे, इंदुबाई तांबे, शिल्पा त्रिभुवन, सचिन तांबे, राजू महेर तसेच गणेश काळे, सुदाम शिंदे, मधुकर शिंदे, साईनाथ शिंदे, नारायण काळे, कैलास तांबे, रंजक तांबे, अप्पासाहेब तांबे, दीपक तांबे, दादासाहेब त्रिभुवन, शुभम तांबे आदी उपस्थित होते.निवडीनंतर फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

## प्रा.सुजाता भोरे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार

**सोलापूर । प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रा. सुजाता भोरे यांना स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श व कृतिशील शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.जागतिक महिला दिनानिमित्त सोलापूर येथे झालेल्या या सोहळ्यात उपमुख्यमंत्री कार्यालयाचे वैद्यकीय कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष अण्णा काळजे अध्यक्षस्थानी होते, तर शिक्षण अधिकारी सचिन जगताप आणि सचिन चव्हाण प्रमुख उपस्थित होते.




गेल्या २० वर्षांपासून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी योगदान दिले आहे. स्वच्छता अभियान, वृक्षलागवड, जलसंधारण, मतदान जनजागृती, एड्स जनजागृती रॅली यासह विविध उपक्रमांमध्ये त्या सहभागी झाल्या आहेत. एनएसएसच्या माध्यमातून हागणदारी मुक्ती, डासमुक्त गाव, स्वच्छता मोहीम यासारख्या संकल्पना राबविल्या.या पुरस्काराबद्दल संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक आणि यशवंत परिवारातील सदस्यांनी अभिनंदन केले.

## सेवानिवृत्त प्रा.महादेव कांबळे यांचे निधन

**सोलापूर । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी पर्यवेक्षक प्रा. महादेव विठ्ठल कांबळे यांचे ८ मार्च २०२५ रोजी



हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.ते माढा तालुक्यातील पिंपळखुंटे येथील मूळ रहिवासी होते. १९८८ मध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रुजू झाले आणि २०१९ मध्ये सेवानिवृत्त झाले.त्यांनी सहकार आणि अकौंटन्सी विषयात तज्ञ प्राध्यापक म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे (बालभारती) येथे ६ वर्षे सहकार विषयाच्या पुस्तक निर्मितीचे कार्य केले. तसेच १२ वी सहकार विषयाच्या पेपर सेटर म्हणून १२ वर्षे कार्य पाहिले.सेवानिवृत्तीनंतर त्यांनी मोफत अकौंटन्सी क्लासच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या निधनाने यशवंत परिवार आणि विद्यार्थ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## थकबाकीदारांना धडा शिकवण्यासाठी नगरपरिषदेची आक्रमक भूमिका : चौकाचौकात झळकले नावे

**बदलापूर । प्रतिनिधी**


नगरपरिषदेच्या महसूल वसुलीला चालना देण्यासाठी मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी धाडसी निर्णय घेत थकबाकीदारांची नावे शहरभर बॅनरद्वारे जाहीर केली. या अनोख्या मोहिमेमुळे शहरात चर्चेला उधाण आले असून, थकबाकीदारांना कर भरण्यासाठी दबाव निर्माण झाला आहे.




बदलापूर शहरात एकूण १,३८,२८० मालमत्ता आहेत, त्यापैकी १,२३,२७३ रहिवासी, १४,३६५ वाणिज्य आणि ६४२ औद्योगिक मालमत्ताधारक आहेत. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ८१.८४ कोटी रुपयांची मागणी असूनही मोठ्या प्रमाणावर कर थकबाकी राहिली आहे.

यापूर्वी नगरपरिषदेने पाच विशेष भरारी पथकांची स्थापना करून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याची मोहीम हाती घेतली होती. सुरुवातीच्या टप्प्यात ५२ मालमत्तांची जप्ती करण्यात आली. मात्र, तरीही कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या मोठी राहिल्याने मुख्याधिकारी गायकवाड यांनी थेट सार्वजनिकरीत्या थकबाकीदारांची नावे जाहीर करण्याचा कठोर निर्णय घेतला.मंगळवारी शहरातील प्रमुख चौकांमध्ये थकबाकीदारांची नावे असलेले बॅनर लावण्यात आले. या निर्णयामुळे कर न भरणाऱ्या नागरिकांवर सामाजिक दबाव येईल आणि ते पालिकेत येऊन थकबाकी भरण्यास प्रवृत्त होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांच्या आक्रमक धोरणाचे शहरात कौतुक होत आहे. मालमत्ता कर वसूल करण्यासाठी घेतलेल्या या धडाकेबाज निर्णयामुळे नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. आता थकबाकीदार या मोहिमेला कितपत प्रतिसाद देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## गोविंद लक्ष्मण राऊत यांचे निधन



**सोलापूर । प्रतिनिधी**

संगोबा निलज येथील गोविंद लक्ष्मण राऊत यांचे काल अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. माजी आमदार जयवंराव जगताप यांचे निस्सीम समर्थक आणि घनिष्ठ मित्र म्हणून त्यांची ओळख होती.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. शंकर राऊत आणि बळीराम राऊत यांचे ते वडील, तर पोलीस पाटील चित्रा राऊत यांचे सासरे होत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .